# देवगिरी नागरी सहकारी बँक लि. औरंगाबाद.

संहतिः कार्य साधिका

मुख्य कार्यालय : अर्थ कॉम्प्लेक्स, केसरसिंगपुरा, अदालत रोड, औरंगाबाद -४३१००१
दुरध्वनी क्र. (०२४०)२३३४१२१, २२४०२००
Website : www.deogiribank.com I Email : deogiribank@gmail.com
(नोंदणी क्रमांक : ए.जी.डी./बी.एन.के./२१५/दि. २४ जानेवारी १९८४)

## ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

देव/मु.का./प्र.शा./वार्षिक सभा /७४६/२०२३-२४ दि.२१/०७/२०२३

बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. ०६/०८/२०२३ रोजी सकाळी ठीक १०:०० वा. तापडीया नाट्यमंदीर, निराला बाजार, औरंगाबाद** येथे आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय :

१) मागील दि. १७/०७/२०२२ रोजीच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
२) संचालक मंडळाचा सन २०२२-२३ चा अहवाल, दि. ३१ मार्च २०२३ चा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ च्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४) शासकीय लेखापरीक्षकांच्या सन २०२२-२३ च्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२३-२४ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यास व त्यांचे मानधन ठरविण्यास मान्यता देणे.
६) सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल स्वीकृत करणे.
७) मा. संचालक मंडळाने बँकेच्या उपविधीमध्ये सुचविलेल्या दुरूस्तीस मान्यता देणे.
८) स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.
९) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१०) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने ऐनवेळी येणारे विषय.

**स्थळ :** औरंगाबाद
**दिनांक :** २१/०७/२०२३

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

### विशेष सूचना :

१) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज नियुक्त ठिकाणीच उपरोक्त वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरू होईल. त्यावेळी गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता असणार नाही. (उपविधी क्र. ३५ (३))

२) ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत काही प्रश्न, सूचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल, त्यांनी दि. २८/०७/२०२३ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ''अर्थ कॉम्प्लेक्स'', केसरसिंगपूरा, औरंगाबाद या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरूपात कळवावे. **प्रश्नकर्त्याने आपण स्वतः थकबाकीदार अथवा थकबाकीदाराचे जामीनदार नाही तसेच शेअर्सची किमान रक्कम पूर्ण भरलेली आहे, हे पाहावे.**

**टीप :**

१) बँकेचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे. कृपया सन्माननीय सभासदांनी आपला अहवाल जवळच्या शाखेतून प्राप्त करून घ्यावा.

२) बँकेच्या सभासदत्वासाठी भागाची रक्कम किमान रू. ५,०००/- निश्चित करण्यात आलेली आहे. ज्या सभासदांकडे यापेक्षा कमी भाग असतील त्यांनी फरकाची रक्कम नजीकच्या शाखेत भरून, आपले सभासदत्व नियमित करून घ्यावे.

३) ज्या सभासदांनी लाभांशाची रक्कम जमा होण्यासाठी खाते क्रमांक दिलेला नसेल, त्यांनी जवळच्या शाखेस आपला खाते क्रमांक द्यावा.

४) सभासदांनी आपल्या पत्त्यात किंवा मोबाईल नंबरमध्ये बदल झालेला असल्यास जवळच्या शाखेस त्वरित कळवावे, जेणे करून आपणास संपर्क साधणे सोयीचे होईल.

वेलवर्थ